# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004

EPABX: ०२५३- २५३९१००/३००, Fax: ०२५३ - २५३१८३६, Ph.: २५३९२१४

**Email:** coe@muhs.ac.in, preexam@muhs.ac.in **Website:** www.muhs.ac.in

MUHS

**डॉ. अजित गजानन पाठक**
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
**परीक्षा नियंत्रक**

**Dr. Ajit Gajanan Pathak**
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
**Controller of Examinations**


जा.क्र. मआविवि/एक्सपी/२९५४/२०२० दि. ०३/०६/२०२०

**महत्वाचे/तात्काळ**

**E-mail द्वारे**

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था,
मआविवि, नाशिक

विषय : प्रस्तावित उन्हाळी-२०२० विद्यापीठ परीक्षेबाबत.

महोदय/महोदया,

आपणास विदीत आहे की, माहे जून-२०२० मध्ये नियोजित विद्यापीठ उन्हाळी-२०२० परीक्षा कोव्हिड-१९ आजारामुळे पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत सदर परीक्षेचे वेळापत्रक जाहिर करण्यात आलेले नाही. परंतु परीक्षा केंद्रांचे नियोजन करणे आवश्यक आहे.

त्यामुळे कोव्हिड-१९ आजाराच्या प्रादुर्भावामुळे विस्कळीत जनजीवन लक्षात घेता, महाविद्यालयीन शैक्षणिक सोयी सुविधांवर ताण येवू नये, विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये व सर्वांची आरोग्याची काळजी घेतली जावी या कारणाने आपल्या महाविद्यालयातच (Home Centre) आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा आयोजित करण्याचे विचाराधीन आहे.

करीता मला प्राप्त आदेशान्वये आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाची इमारत (College Building) ही कोव्हिड-१९ आजाराच्या रुग्णांवर उपचाराकरीता किंवा संभाव्य रुग्णांसाठी विलगीकरण केंद्र (Quarantine Centre) किंवा इतर कोणत्या कारणासाठी शासनाने अधिग्रहीत केली आहे किंवा कसे आणि तेथे उन्हाळी-२०२० लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेवू शकाल की नाही याबाबतची माहिती या coe@muhs.ac.in ई-मेल आयडीवर दि.. ०४ जून, २०२० रोजी संध्याकाळी ०४:०० वाजेपर्यंत करावी.

कळावे.

आपला,

अजित पाठक

(डॉ. अ.ग. पाठक)
परीक्षा नियंत्रक

**प्रत माहितीस्तव :**
(i) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
(ii) मा. प्रति-कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :**
(i) परीक्षा नियंत्रक कार्यालय, मआविवि, नाशिक
(ii) उपकुलसचिव, आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी विद्याशाखा, परीक्षा विभाग
(iii) उपकुलसचिव, वैद्यकिय व दंत विद्याशाखा, परीक्षा विभाग
(iv) उपकुलसचिव, नर्सिंग व तत्सम विद्याशाखा, परीक्षा विभाग
(v) कक्षप्रमुख, सर्व विद्याशाखा, (पदवी व पदव्युत्तर)